## सर्व शिक्षा अभियान जिल्हा परिषद ,परभणी

## कंत्राटी पध्दतीने अंशकालीन निदेशक नियुक्ती जाहिरात

सर्व शिक्षा अभियान, जिल्हा परिषद परभणी अंतर्गत जिल्हा परिषदेच्या उच्च प्राथमिक शाळेसाठी शासन निर्णय क्रमांक एसएसए 2014/ प्र.क्र.60/टीएनटी-01 शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय मुंबई दिनांक 21.08.2014 अन्वये खालील विवरणानुसार तात्पुरत्या स्वरूपाची रिक्त पदे करार पध्दतीने एकत्रित पारिश्रमिकावर भरावयाची आहेत. सदर पदावरील नियुक्त्या कंत्राटी तत्वावरील निव्वळ तात्पुरत्या असुन सदर विषयांचा कार्यभार विचारात घेऊन घड्याळी तासीका तत्वावर असल्याने त्यावरील नियुक्त उमेदवारांना सेवेत कायम करण्याचा व नियमित सेवेचा कोणताही लाभ अनुज्ञेय नाही. तसेच सदरची पदे कदापीही कायम होण्याची शक्यता नाही.

सरळ सेवा भरतीसाठी विहित शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता पुर्ण करणाऱ्या उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवारानी आपले अर्ज **दिनांक 11/11/2014** पर्यंत कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळुन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) सर्व शिक्षा अभियान कार्यालय, प्रशासकीय इमारतीच्या बाजुला शिवाजी नगर, परभणी 431401 या पत्यावर प्रत्यक्ष अथवा पोष्टाने सादर करावेत. विलंबाने आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**पदनिहाय रिक्त पदे:-**

| अ. क्र. | पदाचे नाव | **एकुण भरावयाचे पदे** | **आरक्षण** | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ.जा | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | विमाप्र | इमाव | ईएस बीसी | एसबी सी-ए | खुला |
| 1 | अंशकालीन निदेशक कला शिक्षण | 35 | 4पैकी 1 मा.सै., 1 महिला | 2 पैकी 1महिला | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 7 पैकी 1 मा.सै, 2महिला, 1अंशकालीन | 6 पैकी 1 मा.सै, 2महिला, 1अंशकालीन | 2 | 9 पैकी 1मा.सै, 3महिला, 1अंशकालीन |
| 2 | अंशकालीन निदेशक शारीरिक शिक्षण व आरोग्य | 35 | 4पैकी 1 मा.सै., 1 महिला | 2 पैकी 1महिला | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 7 पैकी 1 मा.सै, 2महिला, 1अंशकालीन | 6 पैकी 1 मा.सै, 2महिला, 1अंशकालीन | 2 | 9 पैकी 1मा.सै, 3महिला, 1अंशकालीन |
| 3 | अंशकालीन निदेशक कार्य शिक्षण (कार्यानुभव) | 35 | 4पैकी 1 मा.सै., 1 महिला | 2 पैकी 1महिला | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 7 पैकी 1 मा.सै, 2महिला, 1अंशकालीन | 6 पैकी 1 मा.सै, 2महिला, 1अंशकालीन | 2 | 9 पैकी 1मा.सै, 3महिला, 1अंशकालीन |

**अपंगासाठी शासन नियमाप्रमाणे समांतर आरक्षण देण्यात येईल.**

**शैक्षणिक अर्हता:-**

| **अ.क्र** | **पदाचे नाव** | **शैक्षणिक अर्हता** | **मासिक पारिश्रमिक** |
|---|---|---|---|
| 1 | अंशकालीन निर्देशक कला शिक्षण | ए.टी.डी./बी.एफ.ए./ए.एम. ही व्यावसायिक पात्रता अथवा नृत्य, गायन किंवा वादन विषयातील गंधर्व महाविद्यालयाची किंवा मान्यताप्राप्त विद्यापिठाची विशारद पदवी अथवा समकक्ष अर्हता. | प्रति तासिका 50 रू याप्रमाणे दरमहा रू 5000/- च्या मर्यादेत |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | अंशकालीन निर्देशक शारीरिक शिक्षण व आरोग्य | कला,वाणिज्य,विज्ञान शाखेतील पदवी किंवा समकक्ष शैक्षणिक अर्हता आणि बी.पी.एड/बी.एड. फिजीकल अथवा समकक्ष व्यवसायिक पात्रता | प्रति तासिका 50 रू याप्रमाणे दरमहा रू 5000/- च्या मर्यादेत |
| 3 | अंशकालीन निर्देशक कार्य शिक्षण (कार्यानुभव) | कला,वाणिज्य,विज्ञान शाखेतील पदवी किंवा समकक्ष शैक्षणिक अर्हता आणि हस्तकला व कार्यानुभव शिक्षण प्रमाणपत्र (Teacher in Handicraft & work experience) ही व्यावसायिक पात्रता. | प्रति तासिका 50 रू याप्रमाणे दरमहा रू 5000/- च्या मर्यादेत |

**उपरोक्त पदभरतीसाठी लेखी परिक्षा दिनांक 23/11/2014 रोजी घेण्यात येईल. सदर तारखेमध्ये बदल झाल्यास तसे कळविण्यात येईल.**

**उपरोक्त दर्शविलेले पदे खालील बाबींच्या आधिन राहून भरण्यात येतील.**

1. उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
2. जाहिरातीत नमुद सर्व पदासाठी उमेदवाराचे वय दिनांक01/10/2014 या दिनांकास किमान वयोमर्यादा 18 वर्षे व कमाल वयोमर्यादा 33वर्षे राहील. मागासवर्गीयांसाठी कमाल वयोमर्यादा 38 वर्षे राहील.
3. उमेदवाराने दिलेल्या विहित नमुन्यात अर्ज सादर करावा. अर्जावर विहित ठिकाणी आलीकडच्या काळातील एक पासपोर्ट साईज फोटो लावावा व फोटो राजपत्रीत किंवा विशेष कार्यकारी अधिकारी यांचेकडुन साक्षांकीत करावा.
4. उमेदवारांनी महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम 2005 मधील नियम 4 नुसार लहान कुटुंब असल्याचे प्रमाणपत्र प्रतिज्ञापत्र नमुना अ मध्ये सादर करणे आवश्यक राहील.
5. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास नोंदणी कार्डाची साक्षांकीत प्रत जोडावी.
6. खुल्या प्रवर्गातील व अनुसूचीत जाती व जमातीचे उमेदवार वगळुन अन्य सर्व मागासवर्गीय उमेदवारास सन 2013-14 चे (नॉन क्रिमीलिअर) प्रमाणपत्र आवश्यक आहे.
7. खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्ती व गट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्याने नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सन 2013-14 चे प्रमाणपत्र आवश्यक आहे.
8. अंशकालीन कर्मचाऱ्यांनी त्यांच्या शासकिय अथवा निमशासकिय कार्यालयातील अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे त्याबाबतचे पुरावे अर्जासोबत जोडावे.
9. उमेदवारांनी त्यांच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.
10. उमेदवाराने ज्या राखीव प्रवर्गासाठी अर्ज केला आहे. त्याचे जात प्रमाणपत्र व जात वैद्यता प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जा सोबत सादर करावी.
11. शासन निर्णय क्र बीसीसी 2011/प्रक/1064/2011, 16-c दिनांक 12 डिसेंबर 2011 अन्वये कंत्राटी भरतीमध्ये ज्या उमेदवारांची निवड मागास प्रवर्गासाठी आरक्षीत असलेल्या पदावर झाली आहे अशा उमेदवारांनी नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन 6 महिण्याच्या आत जात प्रमाणपत्राची वैद्यता संबंधित जात पडताळणी समितीकडुन करुन घेणे आवश्यक राहील. उपरोक्त उमेदवार यांना जात प्रमाणपत्राची वैद्यता तपासणीच्या अधीन राहुन तात्पुरती नियुक्ती देणेत येणार असल्याने नियुक्ती स्वीकारताच जात वैद्यता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव कार्यालयाकडे तात्काळ सादर करावयाचा असुन पोहोंच पावतीची साक्षांकीत प्रत नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे सादर करावयाचे आहे. तथापी याबाबत याचिका क्र 2136/2011 व अन्य याचिकावर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक

25/08/2011 रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय दिल्ली येथे एसएलपी दाखल करण्यात आलेली असुन मा. सर्वोच्च न्यायालयाकडुन प्राप्त होणाऱ्या आदेशाच्या अधीन राहुन नियुक्ती असदेश देण्यात येतील.

12. आवेदन पत्रासोबत खुल्या प्रवर्गातील उमेदवारानी रु. 200/- चा व मागासवर्गीय उमेदवारांनी रु.100/ चा (SSA MPSP PARBHANI) या नावे परभणी येथे देय असलेला राष्ट्रीयकृत बॅकेचा धनाकर्ष (डी.डी.) अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे.
13. अनुभव प्रमाणपत्र शिक्षणाधिकारी (प्रा.), शिक्षणाधिकारी (माध्य.), गटशिक्षणाधिकारी यांनी प्रतिस्वाक्षरी केलेले असावे. प्रतीस्वाक्षरी नसलेले प्रमाणपत्र ग्राहय धरल्या जाणार नाहीत.
14. सदरचा अनुभव हा व्यासायिक पात्रता उत्तीर्ण नंतरचा अनुभव असणे आवश्यक आहे. व्यवसायीक पात्रता उत्तीर्ण पुर्वीचा अनुभव ग्राहय धरल्या जाणार नाही.
15. उमेदवाराने आपले अर्ज ए 4 साईज कागदावर सोबतच्या विहीत नमुन्यात संगणकीकृत / टंक लिखीत करुन सादर करावेत.
16. सदरची पदे कंत्राटी व तात्पुरत्या स्वरुपाची असुन निवड झालेल्या उमेदवारांना कंत्राटी पध्दतीने शैक्षणिक सत्रापुरते आदेश देण्यात येतील. काम समाधानकारक असल्यास नविन शैक्षणिक सत्र सुरू झाल्यानंतर पुर्ननियुक्ती देण्यात येईल.
17. एखाद्या उच्च प्राथमिक शाळेतील इयत्ता 6 वी ते 8 वी च्या वर्गाची पटसंख्या 100 पेक्षा कमी झाल्यास त्याठिकाणच्या अंशकालीन निर्देशकाच्या सेवा आपोआप संपुष्टात येतील.
18. सदरील पदे 31 मार्च 2017 पर्यंत लागु राहतील मात्र त्यानंतर पुर्नविलोकनानंतर ही योजना पुढे चालु ठेवण्याबाबतचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात येणार आहे.
19. यापुर्वी सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या अंशकालीन निर्देशकांनासुद्धा पात्रतेच्या अधिन राहुन परिक्षा देण्यात येणार असून, परिक्षेत प्राप्त गुणांवर त्यांच्या यापुर्वीच्या अंशकालीन निर्देशकांच्या अनुभवासाठी शासन निर्णय क्रमांक एसएसए-2014/प्र.क्र.60/टीएनटी-01 शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय मुंबई दिनांक 21.08.2014 नुसार भारांकन देण्यात येईल.
20. **प्राप्त अर्जाच्या उमेदवारांची लेखी परिक्षा ही 100 गुणांची राहील त्यात सामान्य ज्ञान, कला, क्रिडा, शालेय आरोग्य, कार्यानुभव, इंग्रजी, गणित या विषयाचा अंतर्भाव असेल. उपरोक्त पदभरतीसाठी लेखी परिक्षा दिनांक 23/11/2014 रोजी घेण्यात येईल. सदर तारखेमध्ये बदल झाल्यास तसे कळविण्यात येईल.**
21. सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन निर्णय दिनांक 19/10/2007 अन्वये गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवाराने एकुण गुणांच्या 45% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.
22. पदांची उपलब्ध संख्या व समांतर आरक्षण विचारात घेता लेखी परिक्षेतील प्राप्त गुणांनुसार उमेदवारांची निवड करून गुणवत्ता निहाय संवर्ग निहाय व प्रवर्ग निहाय याद्या तयार करण्यात येतील.
23. अर्जासोबत सर्व संबंधित कागदपत्राच्या छायांकीत/साक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे. विहीत पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज, विहीत नसलेले अर्ज, मजकुर अपुर्ण व चुकीचे भरलेले अर्ज, स्वाक्षरी नसलेले अर्ज, विहीत शुल्क न भरलेले व फोटो नसलेले अर्ज रद्द करण्यात येतील.
24. उमेदवाराची शैक्षणिक अर्हता अर्ज सादर करण्याच्या अंतीम दिनांकास जी आहे ती अंतिम समजण्यात येईल.
25. पोष्टाद्वारे/प्रत्यक्ष अर्ज पाठविताना प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा व पाकीटावर पदाचा उल्लेख करावा. अर्ज स्विकारणे बाबत दिलेलया विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

26. निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती/अगर कागदपत्रे खेटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.
27. कोणत्याही कारणास्तव रिक्त पदांच्या संख्येत बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही, संख्येत बदल अथवा भरती रद्द झाल्यास या बाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. पदांची संख्या, समांतर आरक्षणाबाबत बदल करणे किंवा अंशतः बदल करणे इ. बाबत सर्व अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखुन ठेवले आहे.
28. पदासाठी असलेली किमान अर्हता आणि पात्रता धारण करणाऱ्या, लेखी परिक्षेस पात्र/अपात्र उमेदवारांच्या याद्या परिक्षा केंद्र, बैठक क्रमांकाची यादी www.parbhani.nic.in या संकेतस्ळावर व सर्व शिक्षा अभियानच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात येईल.
29. पदभरती संदर्भात उमेदवारास पत्र पाठविले जाणार नसुन सर्व माहिती ही www.parbhani.nic.in या संकेतस्ळावर प्रसिद्ध केली जाईल व मोबाईल/Email द्वारे कळविण्यात येईल.

**-स्वाक्षरीत-**
**सदस्य सचिव**
**जिल्हा निवड समिती तथा**
**शिक्षणाधिकारी (प्रा)**
**जिल्हा परिषद परभणी**

**-स्वाक्षरीत-**
**उपाध्यक्ष**
**जिल्हा निवड समिती तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद परभणी**

**-स्वाक्षरीत-**
**अध्यक्ष**
**जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हाधिकारी परभणी**

शिक्षणाचा अधिकार
सर्व शिक्षा अभियान

## सर्व शिक्षा अभियान जिल्हा परिषद ,परभणी
## अंशकालीन निर्देशक पदासाठी आवेदनपत्राचा नमुना

| फक्त कार्यालयीन उपयोगासाठी | |
|---|---|
| **अर्जाचा आवक क्र. ............** | **पदाचे नांव :............................................** |

**प्रति,**

**सदस्य सचिव,**
**जिल्हा निवड समिती तथा**
**शिक्षणाधिकारी (प्रा)**
**जिल्हा परिषद परभणी**

[उमेदवाराचे अलिकडच्या काळातील पासपोर्ट साईज फोटो]

1. ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्या पदाचे नाव ........................................................................
2. उमेदवाराचे संपुर्ण नांव :- ..............................................................................................
3. पत्र व्यवहाराचा संपुर्ण पत्ता : ..........................................................................................

   दुरध्वनी क्रमांक व मोबाईल क्र.: .................................................. Email .......................................
4. जन्मतारीख (अंकात) ................................ अक्षरी ..............................................................
5. दिनांक 01/10/2014रोजी वय ................ वर्ष .............. महिने ............. दिवस ..................
6. जातीचे नाव ......................... जातीचा प्रवर्ग .......................

(SC-1, ST-2, VJNT-3, NT(B)-4, NT(C)-5, NT(D)-6, OBC-7, ESBC-8, SBC-A-9, OPEN-10)

7. शैक्षणिक / व्यावसायिक पात्रता

| अ.क्र. | परिक्षेचे नाव | बोर्ड / विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष / महिना | एकूण गुण | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**टिपः-** व्यावसाईक पात्रतेचे गुण नोंदवताना प्रात्यक्षिक व अंतर्गत मूल्यमापनाचे गुण वगळून केवळ लेखी परिक्षेतील एकुण गुण व प्राप्त गुण नमुद करावेत.

8. अनुभव :-

| शाळा / संस्थेचे नाव | पदाचे नाव | सेवा कालावधी | | एकूण सेवा | | अनुभव प्रमाणपत्र (शिक्षणाधिकारी (प्रा,/माध्य),गट शिक्षणाधिकरी यांनी प्रतीस्वाक्षरी केलेले आहे काय? प्रमाणपत्र सोबत जोडावे. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पासुन | पर्यंत | पासुन | पर्यंत | |
| | | | | | | |
| | | | | | | |

9. अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी आहे काय? होय / नाही

10.अर्जदार माजी सैनिक आहे काय ? होय / नाही

11. अर्जदार प्रकल्पग्रस्त आहे काय? होय / नाही

12. अर्जदार अंशकालीन कर्मचारी आहे काय? होय / नाही

13.धनाकर्ष तपशिल : धनाकर्ष क्रमांक ...................... रक्कम रुपये .................. दिनांक ...........................

बॅकेचे नांवः .........................................

वर नमुद केलेली माहिती खरी व बरोबर आहे या पदसाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा मी धारण करीत आहे. याची खात्री करुनच मी हा अर्ज करीत आहे. मी आणखी असे प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे मला मिळालेली नौकरी गमावण्यास मी पात्र राहील. तसेच माझ्या विरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची मला जाणीव आहे. त्यावर माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

**स्थळ : ........... दिनांक :...........**

**उमेदवाराची स्वाक्षरी**
**(उमेदवाराचे संपुर्ण नाव )**

**आवेदनपत्रासोबत खालील कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडाव्यात.**

1. एस.एस.सी. प्रमाणपत्र, एच.एस.सी. गुणपत्रक / प्रमाणपत्र, पदवी गुणपत्रक, व्यावसायिक पात्रता उत्तीर्ण गुणपत्रक
2. सक्षम अधिका-यांचे रहिवासी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र / जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलिअर प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र
3. इतर अनुषंगीक आवश्यक कागदपत्रे.